# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट १९९- २३** **दिनांक : - २२/०६/२०२३**

## "मे" महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) तक्रारदार श्री. योगेश जैन यांना फेब्रुवारी २०२२ मध्ये **'BTC INDIA GROUP-1'** नावाच्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये ॲडमिन नामे ॲमी ने सामील केले होते. सदर ॲडमिनचा फोन नं. +852-46849180 **(HongKong)** असा होता. दिनांक ०८/०२/२०२२ ते दिनांक १४/०५/२०२२ या कालावधीत **BTC INDIA GROUP** चा व्हॉट्सॲप ग्रुपवरुन ॲडमिन ॲमी यांनी तिच्या मो.क्र. अ८५२- ४६८४९१८० वरुन संपर्क करुन इन्व्हेस्टमेंट बाबत माहिती तक्रारदार यांना देवून **BTC** कॉईन ट्रेडींग ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. **BTC** कॉईन ट्रेडींग बाबत सिग्नल देवून नफा कमविण्याचे आमिष दाखवून ट्रेडींग-इन्वेस्टमेंट करण्यास भाग पाडले. त्यावर विश्वास ठेवून तक्रारदार श्री. योगेश यांनी **Binance App** वरुन ३३,६५,६६०/- रुपये खर्च करुन क्रिप्टो करन्सी ३९,५९६ **USDT** खरेदी करून ॲमी हिच्या सांगण्यावरुन **http://trade.mpisvip.com** मधून **BTC** कॉईन **UUID :** २५४९०७३८०२१७८६००९६ ॲपमध्ये ट्रान्सफर केले. दिनांक ०४ मे २०२२ रोजीपासून **BTC** कॉईन ॲप ऑपरेट होत नसल्याचे श्री. योगेश यांचे लक्षात आले. तसेच त्याबाबत त्यांनी ॲमी हिच्याकडे चॅटींगवर विचारणा केली असता कोणतेही उत्तर दिले नाही. व तिचा संपर्क नॉट रिचेबल येत होता. त्यावेळी श्री. योगेश यांचे लक्षात आले की, **BTC** कॉईन ॲप मध्ये गुंतवणूक केलेल्या रक्कमेची फसवणूक झालेली आहे.

सदर तक्रारीवरुन सायबर गुन्हे कक्ष यांनी तात्काळ तपास सुरु करुन फसवणुक झालेली क्रिप्टो करन्सीचा तांत्रीक तपास सुरु केला. तसेच तांत्रीक विश्लेषणानंतर व्यवहार थांबविण्यासाठी तात्काळ संबंधीत **Binance** व **Gate io** या क्रिप्टो करन्सी प्लॅटफॉर्म यांचेशी ईमेल/पत्रव्यवहार करण्यात आला. **Binance** व **Gate io** यांचेकडुन क्रिप्टोकरन्सी बॅलेन्स बाबत कोणतेही उपयुक्त माहिती प्राप्त झाली नाही. परंतू क्रिप्टोकरन्सी चे ट्रेसिंगचे सविस्तर विश्लेषणावरून **OKX (OKX is a global cryptocurrency spot and derivatives exchange) seychelles Country (East Africa)** हया प्लॅटफॉर्मवरील १ संशयीत वॉलेट निष्पन्न करण्यात आले. तसेच संबंधित **OKX** क्रिप्टोकरन्सी एक्सचेंजला पत्रव्यवहार करण्यात आला. सदरचे संशयित वॉलेट हे एका चायनीज नागरिकांचे नावाने असल्याचे निष्पन्न झाल्याने श्री. योगेश जैन यांचे तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. २०५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये दिनांक १६/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

श्री. योगेश जैन यांना त्यांची फसवणूक झालेली रक्कम परत मिळण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज करण्याबाबत माहिती देण्यात आली होती. मा. न्यायालयामध्ये सदर प्रकरणामध्ये सायबर गुन्हे कक्षाकडून करण्यात आलेला तपास ग्राह्य ठरला, सदर तपासामध्ये तक्रारदार श्री योगेश जैन यांचेकडून फसवणूक झालेले

क्रिप्टोकरन्सी हे चायनीज नागरिकांचे वॉलेट मध्ये जमा झाल्याचे व तक्रारदार यांना संपर्क करणारे सर्व संपर्क क्रमांक हे हाँगकाँग देशामधून वापरात येत असल्याचे मा. न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्यात आले.

मा. न्यायालयाने सायबर गुन्हे कक्षाचे सविस्तर अहवालावरुन **OKX** ला गोठविलेली वॉलेट मधील ( **39596USDT- ₮)** ३६,००,०००/- **Rs. (INR)** रुपये मुळ तक्रारदार यांना परत देण्याबाबत सविस्तर आदेश दिले त्याप्रमाणे दिनांक १३/०६/२०२३ रोजी मुळ तक्रारदार यांचे खात्यामध्ये **( 39596USDT- ₮) 36,00,000/- Rs. (INR)** परत मिळालेले आहेत.

सदरची कामगिरी करणारे साबर गुन्हे शाखेचे पो.नि.श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, पो.उप.नि. प्रसाद शेनोळकर, स.फौ. संतोष चव्हाण, म.पो.हवा. माधुरी धिंडे, पो.अंम. प्रविण आव्हाड, गणेश इलग, अमिना पठाण, सवर्णा माळी, पल्लवी निकम, कुणाल सावळे यांचा दिनांक २२/०६/२०२३ रोजी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **" मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि.श्री. सुजितकुमार गुंजकर

२) दिनांक २५/०५/२०२३ रोजी ११:०० वा. च्या सुमारास ऊसगांव तलावाच्या दिशेने जाणा-या कच्च्या रस्त्यावर सफेद रंगाचा हाफ शर्ट आणि सफेद रंगाची पँट असा पेहराव असलेला अंदाजे ५५ ते ६० वर्षे वयाच्या एका पुरुषाचा मृतदेह पडलेला असल्याची मांडवी पोलीस ठाणेस माहिती मिळाली. मांडवी पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली. सदर इसमाच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर झालेल्या जखमांमुळे त्याचा मृत्यू झाला असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले. सदरबाबत करण्यात आलेल्या प्राथमीक चौकशीमध्ये मयताचे नाव भीवा भीक्या वायडा, वय ६० वर्षे, रा. ऊसगाव, पो. भाताणे असल्याचे निष्पन्न झाले. सदरबाबत पो.नि. श्री. शिवानंद शशीकर देवकर (गुन्हे) यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन मांडवी पोलीस ठाणेत गुन्हा.रजि.क्र. १४६/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मांडवी पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या घटनास्थळाचे निरिक्षणामध्ये भीवा वायडा याचा मृतदेह असलेल्या ठिकाणी एका सिमेंटच्या दगडावर रक्ताचे डाग असल्याचे दिसले. तसेच घटनास्थळाच्या जवळ असलेल्या Steelmac कंपनीच्या बाहेर असलेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेजची पहाणी मध्ये दिनांक २४/०५/२०२३ रोजी २१:३८ वा. च्या सुमारास एक डोक्यावर विरळ केस आणि फुल हाताचे शर्ट आणि पॅंट असा पेहराव केलेला इसम घटनास्थळाकडून ऊसगाव नाक्याच्या दिशेने शिरसाड नाका आणि त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ च्या गुजरात वाहीनीवर असलेल्या सर्व्हिस रोडवरुन विरार फाट्याच्या दिशेने पायी चालत जात असल्याचे निदर्शनास आले. सदरबाबत गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या अधारे आरोपीत इसम नामे विनोद ऊर्फ कांद्या महादू बसवत, रा. ऊसगाव असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी त्याच्या आई सोबत एकटाच राहण्यास असल्याने बऱ्याचदा तो घराबाहेर राहत असल्याची माहिती प्राप्त झाली तसेच तो मोबाईल फोन वापरत नसल्याने त्याचा शोध घेणे आव्हानात्मक होते. त्यामुळे सीसीटीव्ही फुटेजची अधिक अवलोकन करुन अरोपीत यास शिरसाड गाव येथुन सापळा करवाई करुन ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे वर नमुद गुन्हयाबाबत तपास करता त्याने मयत भीवा वायडा हा भगताचे काम करत असल्याने त्याने विनोद ऊर्फ कांद्याच्या पत्नीला परत आणण्यासाठी जागरण करावे लागेल असे सांगून विनोद ऊर्फ कांद्या याच्याकडून २०००/- रुपये घेतले होते. परंतु जागरण करुन देखील विनोद ऊर्फ कांद्या महादू बसवत याची पत्नी पुन्हा त्याचे घरी न आल्याने दिनांक २४/०५/२०२३ रोजी रात्री ०८:०० वा. च्या सुमारास विनोद ऊर्फ कांद्या आणि मयत भीवा वायडा यांच्यामध्ये वाद झाला असल्याने त्याचा राग मनात धरुन वर नमुद अरोपीत याने मयत यास एकत्र दारु प्यायलयानंतर त्याचे डोके सिंमेंटच्या दगडावर आपटून त्यांचा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी करणारे मांडवी पोलीस ठाणेचे श्री. प्रफुल्ल वाघ, पो.नि. श्री. शिवानंद देवकर (गुन्हे), स.पो.नि. बाबासाहेब पाटील, संदिप सावंत, पो.उप.नि. अभिजीत टेलर, स.फौ. संदिप मोकल, पो.हवा. किरण मोरे, पो.अंम. संजय मासाळ, अमोल साळुंखे, विशाल भगत यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. प्रफुल्ल वाघ

३) दिनांक २७/०५/२०२३ रोजी मिरारोड पोलीस ठाणे हद्दीतील कोठारी ज्वेलर्स दुकानात दिवसाढवळया दोन अनोळखी आरोपींनी कोठारी ज्वेलर्स दुकानाचे मालकास गावठी कट्टयाचा धाक दाखवुन ज्वेलर्स दुकानात जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करुन दुकानदारासोबत झटापटी करुन दुकानदाराचा मोबाईल फोन जबरीने चोरी केल्याचा गुन्हा घडला होता. सदर गुन्हयाचे अनुषंगाने मिरारोड पोलीस ठाणे व नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांचे गुन्हयातील अनोळखी आरोपी व गुन्हयात वापरलेले हत्याराचा शोध घेणेकरीता विशेष शोध पथक नेमण्यात आले होते.

सदर गुन्हयाच समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष-०१ करीत असताना तपासादरम्यान मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सपोनि/हनिफ शेख, पोउपनि/किरण वंजारी व पथक तसेच नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सपोनि/योगेश काळे व पथक यांनी गुन्हयाचे घटनास्थळावरील तांत्रिक माहितीचे विश्लेषण करुन गुन्हयात वापरण्यात आलेली स्कुटर हस्तगत केली व त्यावरुन आरोपी आकाश मनोज गुप्ता याला निष्पन्न केले. तदनंतर सदर गुन्हे शाखा युनिट ०१, काशिमिराच अधिकारी व अंमलदार यांनी तांञिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयातील आरोपी १) आकाश मनोज गुप्ता, वय २५ वर्षे, सध्या रा. रुम नं.०१/जनशक्ती वेलफेअर सोसायटी, बावशेतपाडा, संतोष भवन,नालासोपारा पुर्व यास काशिमिरा परिसरातुन तसेच अरारोपीत क्र . २) आशुताष कुमार ऊर्फ शिवम संतोषकुमार गुप्ता यास उत्तर प्रदेश राज्यातुन ताब्यात घेतले आहे. सदर गुन्हयाचे तपासात गुन्हयात वापरलेले दोन कावठी कट्टे, १ जिवंत काडतुस व गुन्हा करतांना वापरलेली स्कुटर असा मुद्देमाल हस्तगत केले आहे.

सदरची कामगिरी करणारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयसिंह बागल, पो.नि.श्री. अविवराज कुराडे, स.पो.नि. हनिफ शेख, कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, योगेश काळे, पो.उप.नि. किरण वंजारी, स.फौ. प्रशांत महाले, पो.हवा. प्रफुल्ल महाकुलकर, बालाजी हरणे, प्रदीप गाडेकर, अथर्व देवरे, पाटील, चव्हाण, पुर्ष्येद्र थापा, विकास राजपुत, सनी सुर्यवंश सर्व नेमणुक मिरा रोड पोलीस ठाणे, गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा, नवघर पोलीस ठाणे यांनी संयुक्तरीत्या केल्याने त्यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक -३** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. विजयसिंह बागल व पो.नि. श्री. अविराज कुराडे

४) दिनांक २१/०८/२००८ रोजी २१.३० वा. चे सुमारा काशिदकोपर फाटा, मांडवी, विरार या ठिकाणी राहणाऱ्या सौ. रेखा काशिनाथ चौधरी हया राहत्या घरात झोपले असतांना अरोपीत टेचर बंडया काळे व त्याचे साथीदारांनी आपसात संगणमत करुन हातात लोखंडी सळया घेवून फिर्यादी यांचे बंद दरवाज्यावर लाथा मारुन दरवाजाचा कडी व कोंयडा तोडून घरात प्रवेश करुन फिर्यादी व त्यांचे पती यांना लोखंडी सळयाने मारहाण करुन त्यांचे अंगावरील १७,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने खेचून घेवून पळून गेले होते. सदरबाबत विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं.२१०/२००८, भा. दं. वि. सं. कलम ३९५, ३९७, ४५२, ३४२, सह मोक्का कायदा कलम ३ (१) (दोन), ३ (२), ३ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे टेचर बंडया काळे, रा. ललगुन, ता. पुसेगांव, जि. सातारा हा गुन्हा केलेपासुन सुमारे १५ वर्षापासुन मिळुन येत नव्हता. मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीबाबत गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी हा सातारा जिल्हयात असल्याबाबत माहिती प्राप्त केली. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार हे सातारा येथे जावून वर नमुद गुन्हयातील आरोपीत नामे टेचर बंडया काळे, रा. मु. पो. ललगुन, ता. पुसेगांव, जि. सातारा येथून ताब्यात घेतले. नमुद आरोपी हा विरार पोलीस ठाणेतील गुन्हा.रजि.नं. २१०/२००८, १८४/२००८, १३४/२००८ भा.दं.विव.सं. कलम ३९५, ३९७, ४५२, ३४२, सह मोक्का कलम ३(१)(दोन),३(२),३(४),३ तसेच स्पेशल केस नं ०३/२००९, स्पेशल केस नं ११/२०१२ या गुन्हयातील पाहिजे आरोपी आहे.

सदरची कामगिरी करणारे पो.नि. श्री. राहुल राख, सपोनि. नितीन बेंद्रे, पो. हवा. मनोहर तावरे, संग्राम गायकवाड, राजवीर संधु, प्रविण पवार, अनिल नांगरे, महेश वेल्हे, हनुमंत सुर्यवंशी तसेच स.फौ. संतोष चव्हाण, नेम. सायबर शाखा यांचा **"मे महिन्यातील उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-१** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना स.पो.नि. श्री. नितीन बेंद्रे

५) दिनांक ११/०९/२०२२ रोजी रात्रौ २१.३० वा. ते दिनांक १२/०९/२०२२ रोजी रात्रौ ०२.५६ वा.चे दरम्यान कावेरी ज्वेलर्स, शॉप नं.- १३, पॅराडाईज को-ऑप.हौ.सोसा.एस.टी.डेपो रोड, नालासोपारा पश्चिम ता. वसई, जि. पालघर या बंद ज्वेलर्स दुकानाचे लोखंडी ग्रीलचे कुलुप तसेच बंद लोखंडी शटरचे कुलुप कशाचे तरी

सहाय्याने तोडून सेंटर लॉक तोडण्याचा प्रयत्न करुन सेंटर लॉक न तुटल्याने ज्वेलर्स दुकानाचे बाहेरील सी.सी.टी.व्ही. कॅमेरा चोरी करुन ज्वेलर्स दुकानात घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी नामे गोविंदसिंग कैलाससिंग पुरोहीत नालासोपारा प., ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारी वरुन नालासोपारा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ३७८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८०, ३७९, ४२७, ५११ अन्वये गुन्हा करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३, विरारकडे सुपुर्द करण्यात आला होता. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष, ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे दिपकसिंग उर्फ भुशीसिंग राजुसिंग टाक, वय- ३९ वर्षे, रा. कामतघर, भिवंडी, जि. ठाणे यास ताब्यात घेवुन तपास केला असता सदर आरोपीत यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक ०८/०५/२०२३ रोजी १६.२३ वाजता अटक करण्यात आले. अटक आरोपीत याचेकडे अधिक तपास करता त्याने चोरी केलेल्या २ इको कार व १ शेवरलेट एंन्जॉय कार असा १०,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन मि.भा.व.वि., ठाणे, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाणेत दाखल असलेले घरफोडी चोरी व चारचाकी वाहन चोरीचे १० गुन्हे उघडकीस आले आहेत.

अटक आरोपीत हा सराईत गुन्हेगार असून त्याचेविरुध्द म.को.का., खून, दरोडा, घरफोडी चोरी विशेषतः ज्वेलर्स दुकान चोरी, चारचाकी मोटर वाहन चोरीसारखे १० पेक्षा जास्त गुन्हे गुजरात, नवी मुंबई, ठाणे शहर, मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयांर्गत विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष ३, विरार युनिटचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, मनोज सकपाळ, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांचा **"मे महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड " क्रमांक-२** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. प्रमोद बडाख

६) माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये फिर्यादी नामे श्रीमती जयश्री कृष्णा मगजी, वय ६४ वर्षे हे मधुरम हॉटेल येथुन घरी जात असताना दिनांक २८/०५/२०२३ रोजी २ पुरुष व १ महिला यांनी पैशांचे आमिष दाखवुन बोलण्यामध्ये गुंतवुन त्यांच्या अंगावरील रु.७५,०००/- किंमतीचे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व कानातील झुमके काढुन देण्यास सांगुन त्याबदल्यात नोटांचा बंडल असल्याचे भासवुन नोटांच्या आकाराचा कागदांचा बंडल व दागिने असल्याचे भासवुन रुमालात बारीक दगड देवुन फसवणुक केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणेत गु.रजि.क्र. १९९/२०२३ कलम ४२०,३४ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) विजय विनोद सोळंखी ऊर्फ विजय रमेश चव्हाण, वय २० वर्षे, रा. सुलतानपुरी, नॉर्थ वेस्ट, नवी दिल्ली, २) हरीश रामा राठोड ऊर्फ हरीश विष्णु राठोड, वय २८ वर्षे, रा. टगौर गार्डन, दिल्ली पश्चिम, ३) रवि पेलहाद राठोड, वय २८ वर्षे, रा. टँकीवाली झुगी, दिल्ली कॅन्टजवळ, नवी दिल्ली, ४) श्रीमती चौथी बालकिशन परमार ऊर्फ चौथी नारायण सोलंकी, वय ३४ वर्षे, सध्या रा. सुलतानपुरी, नॉर्थ वेस्ट, नवी दिल्ली यांना विरार पुर्व येथे सापळा रचुन शिताफीने अटक केले

नमूद अटक आरोपीत व त्यांचे सहकाऱ्यांनी अशाच प्रकारचे गुन्हे मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई परिसरामध्ये परिसरात केल्याचे निष्पन्न झाले असून त्यांचेकडुन इकडील आयुक्तालय तसेच मुंबई शहर आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मिळुन एकुण ०६ गुन्हे व अंदाजे ५९ ग्रॅम वजनाचे ०२,९५,०००/- रुपये किंमतीचे दागिने जप्त करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी करणारे माणिकपूर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव पाटील, स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटील, धनंजय चौधरी, अनिल चव्हाण, पो.शि. प्रविण कांदे यांचा **"मे महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-३ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.
देवुन सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. संपतराव पाटील

७) वसई पोलीस ठाणेत अपहृत अल्पवयीन १२ वर्षीय मुलीचे दिनांक २०/०५/२०२३ रोजीचे सकाळी ०६.०० वा. चे सुमारास अपनयन झाल्याबाबत गुन्हा रजि.नं. १५३/२०२३ भा.द.वि.स.क. ३६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची दोन पथके तयार करुन त्यांना गुन्हा उघडकीस आणण्याकरीता सूचना दिल्या. त्याअनुषंगाने नमूद पथकाने मिळालेल्या गोपनीय व घटनास्थळावरील तांत्रिक माहितीच्या आधारे संशयित इसमाचे नाव शेर खान निष्पन करुन त्याचा मोबाईल क्रमांक प्राप्त केला.

नमूद संशयिताचे लोकेशन हे तळोजा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील एका बांधकाम साईटवरील असल्याने त्याठिकाणी पोलीस पथकाने स्थानिक पोलीसांच्या मदतीने जावुन शोध घेतला असता सदरठिकाणी पत्र्याचे खोलीमध्ये पिडित मुलगी व संशयित आरोपीत शेर खान हे मिळुन आले. आरोपीताने पिडीत मुलीवर लैगिक अत्याचार केले असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयामध्ये भा.दं.वि.सं. कलम ३७६ (२) (एन), ३७६ (२) जे, ३७६ (३), सह पोस्को ४, ८, १२ नव्याने समाविष्ठ करुन आरोपीत यास सदर गुन्हयामध्ये लागलीच अटक केली.

अशाप्रकारे अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचे गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन वसई पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखा तसेच तपासी अधिकारी यांनी गुन्हयाची गुन्हा दाखल झाल्यापासुन १२ तासामध्ये उकल केली.

सदरची कामगिरी करणारे वसई पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रणजित आंधळे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. सुनील पवार, सागर चव्हाण, पो.अंम. सुर्यकांत मुंढे, राजेंद्र जाधव, अमोल बर्डे यांचा **"मे महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-४** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. रंजित आंधळे

---ooo---